**प्रेसनोट** **दि.२१/०५/२०१९**

## दत्तवाडी पोलीस स्टेशन पुणे

## रिक्षा चोरणा-या रिक्षा चोरास दत्तवाडी पोलीसांनी केले जेरबंद

दत्तवाडी पोलीस ठाणेचे पोलीस उप निरिक्षक कुलदिप संकपाळ हे स्टाफसह दत्तवाडी पोलीस स्टेशन हद्दीत वाहन चोरीस प्रतिबंध करण्यासाठी पेट्रोलिंग करीत असताना पो. शि. सागर सुतकर यांना त्यांचे खास बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, ‘‘सहकारनगर नं. २ पुणे येथील श्रेयस ऑर्नेट सोसायटीचे भिंतीजवळुन यापुर्वी चोरीस गेलेली रिक्षा ही चोरणारा ऋषीकेश अविनाश धेंडे वय. १९ वर्षे, रा. शिवतेजनगर, अप्पर इंदिरानगर, पुणे हा सध्या गोळेवाडी सिंहगड ता. हवेली जि. पुणे या गावात आहे.’’अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने वरिष्ठ पोलीस निरिक्षक देविदास घेवारे यांनी पोउनि कुलदिप संकपाळ व पोलीस स्टाफ यांना गोळेवाडी सिंहगड ता. हवेली जि. पुणे येथे पाठविले वरील इसमाचा संपुर्ण परिसरात शोध घेवुन त्यास पकडुन दत्तवाडी पोलीस ठाणेस आणले असता त्याच कडे यापुर्वी चोरीस गेलेल्या रिक्षा बाबत तपास करता त्याने वरिल रिक्षा चोरल्याचे कबुल केले आहे.

सदरची कारवाई ही दत्तवाडी पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक देविदास घेवारे व पोलीस निरिक्षक (गुन्हे) राजेंद्र सहाणे यांचे मार्गदर्शेना खाली तपास पथकाचे प्रभारी पोलीस उप निरिक्षक कुलदिप संकपाळ व पो.हवा.तानाजी निकम,पो.हवा.रविंद्र फुलपगारे, पो.ना.महेश गाढवे, पो.ना सोमेश्वर यादव, पो शि सागर सुतकर, पो.शि विकास कदम, पो.शि.राहुल ओलेकर, पो.शि शिवाजी क्षीरसागर, पो.शि अमित सुर्वे, व पो.शि अमोल लोहार यांनी केली आहे. तसेच दाखल गुन्हयाचा पुढील तपास हा पोलीस उप निरिक्षक कुलदिप संकपाळ हे स्वतः करीत आहेत.

(देविदास घेवारे)<br>
वरिष्ठ पोलीस निरीक्षक<br>
दत्तवाडी पो.स्टे. पुणे शहर